

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित,

# विवेकानंद कॉलेज (स्वायत्त), कोल्हापूर

## विषय :- सम्राट अशोकाच्या ऐतिहासिक शिलालेखांचा अभ्यास.

**संशोधकांचे नाव :-**

उत्तम राजेंद्र पांडव T.Y.B.A. (History)

शाकीफ सलिम काझी T.Y.B.A. (History)

**इतिहास विभाग :-**

सन २०१८ - २०१९

डॉ. मंजुश्री घोरपडे

डॉ. सिध्दार्थ कट्टीमनी

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | | पा. नं. |
| १. | प्रतिज्ञापत्र | ३ |
| २. | ऐतिहासिक प्रस्तावना | ४ |
| ३. | उद्दिष्ट्ये | ५ |
| ४. | गृहितके | ६ |
| ५. | प्रकरण | ७-१९ |
| ६. | शिलालेखांची भाषा व लिपी | २० |
| ७. | शिलालेखांचे ऐतिहासिक महत्त्व | २१ |
| ८. | संदर्भ साधने | २२ |
| ९. | प्रमाणपत्रे | २३ |


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# प्रतिज्ञापत्र

आम्ही बी. ए. भाग तीन मधील इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी " सम्राट अशोकाच्या ऐतिहासिक शिलालेखांचा अभ्यास " या विषयावरील पुढील प्रकल्प अहवाल सादर करत आहे.

या प्रकल्पात प्राचीन कालीन गिरनार येथील सम्राट अशोकाचे प्रस्तरलेख यांचा अभ्यास करून तसेच याचा आढावा या प्रकल्पात सादर करण्याचा प्रयत्न करीत आहे.

तसेच या प्रकल्पाच्या माध्यमातून प्राचीन कालीन शिलालेखांची माहिती संदर्भ ग्रंथाच्या आधारे देण्याचा प्रयत्न करत आहे.

कु. उत्तम राजेंद्र पांडव

शाकिफ सलीम काझी

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# ऐतिहासिक प्रस्तावना

शिलालेख आणि ताम्रपट ही प्राचीन इतिहास लेखनाची अस्सल साधने होत. त्यांच्या आधारे प्राचीन लिपी, भाषा, राजकीय परिस्थिती, समाज, धर्म, वाङ्मय इ. गोष्टींचे ज्ञान मिळते. हे ज्ञानभंडार ब्राम्ही लिपीमध्ये बव्हंशी होते आणि ते दीडशे वर्षापूर्वीपर्यंत सर्वस्वी दुर्बोध होते. ब्राम्ही लिपी वाचण्याची गुरूकिल्ली जेम्स प्रिन्सेस यांनी शोधून काढली. सम्राट अशोकाचे लेख भारतातील सर्वात प्राचीन लेख असल्यामुळे त्यांचा वेगळ्या प्रकरणात समावेश केला. मौर्य सम्राट अशोकाचे लेख भारताच्या चारी टोकास असल्यामुळे त्याच्या राज्याचा विस्तार संबंध भारत वर्षावर होता ही गोष्ट समजते. अशोकाच्या शिलालेखावरून त्यातील ऐतिहासिक माहिती ज्ञात होते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# उद्दिष्ट्ये

१} सम्राट अशोकाच्या शिलालेखांचा अभ्यास करणे.

२} सम्राट अशोकाच्या शिलालेखातून सामाजिक, आर्थिक, राजकीय, जीवनाचा अभ्यास करणे.

३} सम्राट अशोकाच्या शिलालेखांच्या भाषा व लिपीचा अभ्यास करणे.

४} सम्राट अशोकांच्या शिलालेखांचे ऐतिहासिक लिखित साधने म्हणून ती समजावून घेणे.

५} सम्राट अशोकाच्या धर्म तत्वांच्या प्रसाराचा अभ्यास करणे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# गृहीतके

१) जीवहत्या, प्राणीहिंसा, नातेवाईक, ब्राम्हण आणि श्रमण याविषयीचा अनादर टाळण्याचा पुरेपूर प्रयत्न केला हे सम्राट अशोकाच्या चौथ्या प्रस्तरलेखावरून समजते.

२) कल्याणकारी गोष्टी करून त्याच्यातून पुत्र पौत्र व यानंतर येणारे वंशज ते अनुसरावेत अशी भावना ठेवून धर्मलेखन लिहून धर्माचा पगोडा स्थापन केला. हे सम्राट अशोकाच्या पाचव्या प्रस्तरलेखावरून समजते.

३) सम्राट अशोकाच्या सहाव्या प्रस्तरलेखावरून राजाची आपल्या प्रजेवरील प्रेमभावना व आपुलकीपणा दिसून येतो.

४) मंगल समारंभात खर्च करण्याऐवजी ते धर्माचरणात करणे हे महाफलदायी असे हे सम्राट अशोकाच्या नवव्या प्रस्तरलेखावरून दिसून येते.

५) धर्मतत्त्वे ऐकावित व त्यांचे पालन करावे व सर्व धर्मसंप्रदाय बहुश्रुत आणि कल्याणकारी सिद्धांचे असावेत हे सम्राट अशोकाच्या बाराव्या प्रस्तरलेखावरून समजते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

# प्रकरण

१) चौथा प्रस्तरलेख

२) पाचवा प्रस्तरलेख

३) सहावा प्रस्तरलेख

४) नववा प्रस्तरलेख

५) बारावा प्रस्तरलेख

६) तेरावा प्रस्तरलेख


७) शिलालेखांची भाषा आणि लिपी

८) शिलालेखांचे ऐतिहासिक महत्त्व

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

## ➢ "गिरनार येथील सम्राट अशाकाचे प्रस्तरलेख"

### चौथा प्रस्तरलेख



मौर्यसम्राट अशोकाचे गिरनार प्रस्तरलेख - ३.४

१) शेकडो वर्षाचा काल व्यतीत झाला. जीवहत्या, प्राणहिंसा, नातेवाईक, ब्राम्हण आणि श्रमण यांच्याविषयीचा अनादर या गोष्टी वाढल्या आहेत.

२) परंतु आता देवांच्या लाडक्या प्रियदर्शी राजाच्या धर्माचरणाने मेरीघोष (युध्दाची तयारी) धर्मघोष (धर्मप्रचार) झाला आहे. लोकांनी अवकाशयाने, हत्ती, अग्निज्वाला आणि स्वर्गीय प्रदर्शन दाखविले.

३) या गोष्टी शेकडो वर्षापूर्वी अस्तित्त्वात नव्हत्या. त्या आता वाढीस लागल्या आहेत. देवांच्या लाडक्या प्रियदर्शी राजाच्या धर्माच्या

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964

शिकवणीमुळे जीवहत्या व प्राणीहत्या यास प्रतिबंध होत आहे. नातेवाईक, ब्राम्हण आणि श्रमण यांचा मान राखला जात आहे. माता-पिता वडीलधारी मंडळी यांची सेवा होत आहे.

४) अशा तऱ्हेने आणि इतर अनेक प्रकारांनी धर्माचरण वाढीस लागते.

५) देवांचा लाडका प्रियदर्शी राजा या धर्माचरणाची सतत वृद्धी वरील.

६) देवांच्या लाडक्या प्रियदर्शी राजाचे पुत्र, पौत्र व प्रपौत्र जगाच्या अंतापर्यंत या धर्माचरणाची वृद्धी करतील धर्माचरणाने आणि सदाचरणाने वागून (लोकांनी) धर्माचरणाची शिकवण देतील.

७) धर्माची शिकवण हे सर्वश्रेष्ठ कार्य आहे.

८) धर्माची शिकवण करणे हे चारित्र्याहिनाला शक्य नाही.


९) त्यामुळे या कार्याची वृद्धी आणि जपणूक करणे योग्य आहे.

१०) या कारणास्तव हे लिहिविले आहे. त्यांनी या कार्याला वाहून घ्यावे त्याची हयगय करू नये.

११) देवांच्या लाडक्या प्रियदर्शी राजाच्या राज्याभिषकेला बारा वर्षे झाल्यावर हे (त्याने) लिहविले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# पाचवा प्रस्तरलेख



मौर्यसम्राट अशोकाचे गिरनार प्रस्तरलेख - ५

१) देवांचा लाडका प्रियदर्शी राजा असे सांगतो.

२) कल्याणकारण कृती करणे अवघड आहे.

३) जो कल्याणकारक कृतींचा प्रारंभ करतो त्यास अतिशय कठीण गोष्टींची प्राप्ती होते.

४) मी पुष्कळ कल्याणकारक गोष्टी केल्या.

५) म्हणून माझे पुत्र पौत्र त्यानंतर येणारे माझे वंशज यानी यांचे (कर्तव्य) कल्पान्तांपर्यंत अनुसरण केले तर ते सुकृत करतील.

६) परंतु जो यातील एखादा अंशही नष्ट करील तो दुष्कृत्य करील.

७) कारण पाप करणे सोपे असते.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964

८) यापुर्वी धर्ममहापात्र नव्हते.

९) परंतु राज्याभिषेकानंतर तेरा वर्षांनी धर्ममहापात्रांची मी नियुक्ती केली.

१०) धर्माच्या अधिष्ठानासाठी सर्व धर्मसंप्रदायांमध्ये त्यांची नियुक्ती केली............ हे धर्मप्रवरण यवन, कंबोज, गंधार, राष्ट्रिक पेलेनिक आणि अपरान्त सीमेवर आहेत.

११) त्यांची योजना स्वामी आणि सेवकांवर आहे. ....... जे धर्मशील आहेत. त्यांच्या सुखासाठी त्यांची (इहलोक) लोभापासून मुक्ती करण्यासाठी नियुक्ती केली आहे.

१२) तुरुंगातील लोकांसाठी, मुलांसाठी, ज्यांच्यावर जादुटोणा झाला आहे. त्यांच्यासाठी आणि वृदधांसाठी त्यांची नियुक्ती केली.


१३) पाटलीपुत्र (शहरात) आणि इतरत्र जेथे माझ्या लाग्याबांधाचे लोक आहेत तेथे ते (धर्ममहामात्र) आहेत.

१४) हे धर्ममहामात्र......... जो धर्माचरणास उत्सुक आहे.

१५) या कारणात्सव हा धर्मलेख लिहिविला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# सहावा प्रस्तरलेख



मौर्यसम्राट अशोकाचे गिरनार प्रस्तरलेख - ६

१) देवांचा लाडका प्रियदर्शी राजा असे सांगतो.

२) पुर्वीच्या काळी लोकांची प्रकरणे रीतसर मिटवणे आणि प्रत्येक गोष्ट (राजाला) निवेदन करणे या गोष्टी अस्तित्वात नव्हत्या.

३) परंतु मी त्या खालीलप्रमाणे (व्यवस्था) केल्या.

४) मी सर्व ठिकाणी हेर नेमले. मी जेवत असलो, मी जनानखान्यात असलो किंवा अंतर्गृहात असलो तरी हेरांनी लोकांच्या अडचणी मला येऊन ताबडतोब सांगाव्यात.

५) मी कोठेही लोकांच्या अडचणीचे निवारण करीन.

६) जर मंत्रीमंडळात वादग्रस्त प्रश्न निघाला किंवा एखाद्या देणगीबाबत किंवा माझ्या तोंडी सांगितलेल्या निवाड्यात



KANAND COLLEGE KOLHA
ESTD
JUNE

अडचण उत्पन्न झाली किंवा एखादी तातडीची गोष्ट मंत्र्यांना सांगितली तर ती मला केव्हाही मी कुठे असेल तिथे सांगावी.

७) म्हणून अशा तऱ्हेच्या मी आज्ञा दिल्या आहेत.

८) अडचणीचे निवारण करणे आणि कामकाजाचा निकाल लावणे (या गोष्टी) केल्याशिवाय मला समाधान होत नाही.

९) लोककल्याण हे माझे कर्तव्य आहे असे मी समजतो.

१०) अविरत काम आणि अडचणीचे निवारण हा त्याचा पाया आहे.

११) लोक कल्याणाची वृद्धी यासारखे श्रेष्ठ कर्तव्य नाही.

१२) मी जे प्रयत्न करीत आहे त्यामुळे मी लोकांचे ऋण फेडीन आणि त्यांना मी इहलोही आणि परलोकी सुखी करीन.

१३) या हेतूने ही धर्माज्ञा मी लिहविली आहे. ती चिरकाल टिको. माझे पुत्र प्रपौत्र या धर्माज्ञेचे लोककल्याणासाठी आचरण करीत.

१४) परंतु याचे आचरण करण्यास अतिशय करण्यास कठीण आहे. श्रेष्ठतम प्रयत्नाशिवाय ते आचरणात आणणे शक्य होणार नाही.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# नववा प्रस्तरलेख



मौर्यसम्राट अशोकाचे गिरनार प्रस्तरलेख ९, १०

१) देवांचा लाडका प्रियदर्शी राजा असे सांगतो.

२) लोक लहान-मोठ्या प्रमाणावर समारंभ करीत असतात आजारीपणात (कन्या व पुत्र यांच्या) विवाह समारंभात पुत्रजन्म प्रवास या आणि इतर अन्य प्रंसगी लोक लहानमोठ्या प्रमाणावर समारंभ करीत असतात.

३) परंतु अशा प्रसंगी स्त्रिया विविध प्रकारचे क्षुद्र आणि निरर्थक आचार विधी करतात.

४) मंगल समारंभ करणे क्वचितपणे आवश्यक आहे.

५) परंतु असे समारंभ निष्फळ आहेत.

६) धर्माचरण हेच महाफलदायी आचरण आहे.

७) यामध्ये दास आणि सेवक यांना योग्य वागणूक वडीलधाऱ्या मंडळींचा आदर प्राणी मात्रावरील दया, ब्राम्हण आणि श्रमण

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

यांना दान देणे ही आणि अशा तऱ्हेचे वागणूक यालाच धर्माचरण म्हणतात.

८) म्हणुन पिता, पुत्र, बंधु, स्वामी यांनी 'हे चांगले आहे' असे म्हटले पाहिजे हे पुण्यकारक आहे, हे आचरण इप्सिताची प्राप्ती होईपर्यंत अवलंबिले पाहिजे.

९) 'दान करणे, पुण्यकारक आहे' असे म्हटले आहे.


१०) परंतु धर्मदान व धर्मानुग्रह यासारखे दुसरे दान व अनुग्रह नाही.

११) यासाठी मित्र, सहृदय, सग्यासोयऱ्यांनी ' हे केले पाहिजे ' हे पुण्यकारक आहे असा प्रसंगोपचित उपदेश केला पाहिजे. त्यामुळे स्वर्गप्राप्ती शक्य आहे.

१२) स्वर्ग प्राप्ती खेरीज दुसरी कसली इच्छा आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# बारावा प्रस्तरलेख



मौर्यसम्राट अशोकाचे गिरनार प्रस्तरलेख ११ ते १२

ओळ १ अ]- देवांचा लाडका प्रियदर्शी राजा सर्व धर्मसंप्रदाय संन्यासी आणि गृहस्थाश्रमी लोकांचा दान आणि विविध प्रकारचे प्रकारचे सन्मान यांनी मानमरातब राखतो.

ओळ २ आ]- देवांचा लाडका राजा दान आणि सन्मान यापेक्षा सर्व संप्रदायांच्या तत्त्वप्रणालीची वृध्दीला जास्त महत्त्व देतो.

इ]- तत्त्वप्रणालीची वध्दीला जास्त महत्त्व देतो.

ओळ ३ ई]- वाकसंयम हे त्याचे मुळ आहे. स्वधर्मस्तुती आणि परधर्मनिंदा अप्रसंगिक असु नयेत आणि त्याही त्या त्या वेळी संयमित असाव्यात.

ओळ ४ उ]- प्रत्येक वेळी दुसऱ्या संप्रदायांचा यथायोग्य सन्मान केला पाहिजे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

ऊ]- अशा तऱ्हेने वागणूक करणारा मनुष्य आपल्या धर्माची वृध्दी करतो आणि दुसऱ्या धर्माला उपकृत करतो.

ओळ ५ ए]- याच्या विपरीत वागणारा आपल्या संप्रदायाचे नुकसान करातो आणि दुसऱ्या संप्रदायावर अन्याय करतो.

ओळ ५-६] - आपला संप्रदाय उज्ज्वल करण्याच्या इच्छेने आणि त्यावरील भक्तीने जो स्वधर्मस्तुती आणि परधर्मनिष्ठ करतो तो स्वधर्माचीच जास्त हानी करतो.

ऐ]- म्हणुन समन्वय योग्य आहे.

ओळ ७ - म्हणुन परस्पर धर्मतत्त्वे ऐकावीत व त्यांचे पालन करावे. सर्व धर्मसंप्रदाय बहुश्रुत आणि कल्याणकारी सिंद्धाताचे असावेत अशीच देवांच्या लाडक्या राजाची इच्छा आहे.

ओळ ८ औ]- ज्याची आपल्या संप्रदायावर भक्त् आहे त्यावेळी असे सांगावे.

अं]- देवांचा लाडका राजा सर्व संप्रदायांच्या तत्त्वबुद्धामध्ये दान आणि पूजा यांपेक्षा जास्त महत्त्व देतो.

ओळ ८-९ अः]- या कारणास्तव धर्ममहामात्र, ललनाध्यक्ष महामात्र, वज्रभुमीक असे निरनिराळे अधिकारी नेमले आहेत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# तेरावा प्रस्तरलेख



मौर्यसम्राट अशोकाचे गिरनार प्रस्तरलेख १३, १४

ओळ १ अ]- राजाने कलिंग जिंकला.

आ) तेथे लाख लोक मारले गेले आणि पुष्कळ मेले.

इ]- त्यानंतर कलिंग देश अंकित केल्यावर धर्माचरणाची तेथे वृद्धी झाली.

ओळ २ ई]- देवांच्या लाडक्या राजाला पश्चात्ताप....... हत्याकांड लोकांचे परागंदा होणे या गोष्टी दु:खकारक, क्लेशकारक आहेत.

ओळ ३ - ब्राम्हण आणि गुरुंचे आज्ञापालन, मित्र, परिचित, ज्ञातिबांधव सेवक-दास...... आवडत्या माणसांची पाठवणी.

ओळ ४ उ]- मित्र ज्ञातिबांधव संकटग्रस्त होतात, ही विपत्ती त्यांवर आघात आहे.

ऊ]- सगळ्यांनाच तो सोसावा लागतो.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964

ओळ ५ ए]- कुठल्यातरी संप्रदायावर विश्वास नाही असा यवन देशाखेरीज (इतर कोणत्याही) लोकांचा समाज नाही.

ऐ]- जितके लोक त्यावेळी होते.

ओळ ६-७] - त्यातील थोडा भागही गंभीर आहे. असे देवांच्या लाडक्या राजाच्या राज्यात ज्या बनांचा अंतर्भाव आहे, त्या सगळ्यांना संयम आहिंसा मार्दव आणि दयाळूपणा सांगितला जाईल.

ओळ ८ ओ] - देवांच्या लाडक्या राजाने अंकित केलेले येथील आणि बाकीचे...... यवन राजा त्यांच्यापजीकडील चार राजे तुरमाय अंतेकिन मगा..............

ओळ ९ औ]- इथे राजाच्या प्रदेशात यवन, कंबोज, आंध्र आणि पुलिंद देशात देवाच्या लाडक्या राजाने सांगितले, त्या धर्मचरणाचा लोक अवलंब करीत आहेत.

ओळ १०-११ अं]- ज्या विजयामुळे प्रेमभावना (वृद्धिंगत) होते तोच खरा विजय.

अः]- ती प्रिती विजयामध्ये प्राप्त हेते.

ओळ ११ ड]- या हेतुसाठी ही धर्मालिपी नव्या विजयाचा विस्तार करता कामा नये.

च]- जर विजयाची इच्छा असेल, तर ती शांतीने (मिळेल)

ओळ १२ ज]- इहलोकिचा, परलौकिक......



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# शिलालेखांची भाषा आणि लिपी

अशोकाच्या कोरीव लेखांची संख्या चाळीसच्या आसपास असून मोठ्या शिळांवरील राजाज्ञा, लहान शिळांवरील राजाज्ञा, स्वतंत्र दगडावरील राजाज्ञा, मोठ्या स्तंभावरील व लहान स्तंभावरील राजाज्ञा अशा पाच गटात त्यांची विभागणी केली जाते. अशोकाचे नाव फक्त लहान शिळावरील राजाज्ञाच्या प्रतिकृतीत आळते. अन्य कोरीव लेखांनवर फक्त देवानाम पिय पियदस्सी एवढाच त्याचा उल्लेख येतो. अशोकाचे हे लेख सामान्यपणे प्राकृत भाषेत ब्राम्ही लिपीत कोरलेले आढळतात. परंतु भारताच्या वायव्य भागात आढळलेले लेख आरमाइक भाषेत व खारोष्ठी लिपीत आढळतात. अफगाणिस्तानात ते आरमाइक व ग्रीक भाषांमध्ये कोरलेले आहेत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# शिलालेखांचे ऐतिहासिक महत्त्व

अशोकाचे शिलालेख हे अशोकाच्या कारकिर्दीच्या इतिहासाची अतिशय महत्त्वाची अशी साधने आहेत. ज्या - ज्या ठिकाणी हे आलेख सापडले. त्यावरून मौर्य साम्राज्याच्या सीमा निश्चित करणे शक्य होते. अशोकाच्या कारकिर्दीत झालेल्या कलिंगच्या युध्दाची माहिती त्याच्याच कलिंग आलेखातून मिळते. अशोकाच्या कारकिर्दीचा कालानुक्रम निश्चित करण्यासाठी या आलेखांची मदत झाली. अशोकाने बौध्द धम्माचा स्वीकार केल्याचा पुरावा यामधून मिळतो.

बौध्द धम्माचा प्रसारासाठी अशोकाने केलेल्या कामगिरीचे वर्णन यातून मिळते. बौध्द धम्माची दीक्षा घेतली असली तरी, अशोक कर्मठ नव्हता तसेच आपल्या प्रजाजनांवर बौध्द धम्म सक्तीने लादण्याचा अशोकाने कधीच प्रयत्न केला नसल्याचेही या आलेखातून स्पष्ट होते. परदेशात बौध्द धर्म आणि भारतीय संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी अशोकाने बौध्द भिक्षूंना पाठवल्याचा लेखी पुरावा या शिलालेखांतून मिळतो

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# संदर्भ साधने


१) गोखले शोभना - पुराभिलेखविद्या, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००७

२) गोखले शोभना - प्राचीन भारतीय इतिहासाची साधने टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे - २००८

३) ओझा गौरशंकर - प्राचीन भारतीय लिपीमाला मुन्शीराम मनोहरलाल नवी दिल्ली, १९७७

४) कोलते वि. भी. (संपा)- महाराष्ट्रातील काही ताम्रपट आणि शिलालेख महाराष्ट्र साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ पुणे, १९८७

५) Burgess and pandit Indraji- Inscriptions from the cave twmples of western India. With descriptive notes vol. 4



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# प्रमाणपत्र

उत्तम राजेंद्र पांडव व शाकीफ सलिम काझी यांनी शिवाजी विद्यापिठाच्या बी. ए. भाग तीन विषयासाठी सादर केलेला प्रकल्प हा सम्राट अशोकाच्या शिलालेखांचा अभ्यास करणे हा माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे.

मार्गदर्शक -

डॉ. मंजुश्री घोरपडे

डॉ. सिध्दार्थ कट्टीमनी

For HOD **विभाग प्रमुख,**
**इतिहास विभाग,**
**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# धन्यावाद

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)